भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३४६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०७/२०१८

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन शिवीगाळ करून लाठया–काठयाने मारहान करून जखमी केल्याने गुन्हा नोंदः –**

दिनांक ०७/०७/०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे जनावरे चारून घरी परत येत असतांना यातील आरोपीने आपली गाडी आयसर क्र. एमएच ३६/२८७८ ट्रक रोडवर ऊभी केल्याने त्यास गाडी बाजुला करा माझे जनावरे घाबरतात असे बोलले असता आरोपी क्र. १ यानी गैरकायदयाची मंडळी जमवुन 'तुमच्या बापाचा रोड आहे' का असे बोलुन शिवीगाळ केली व गावातील इतर लोकांचे घरात घुसुन महिलांची छेडछाड करून १) चंद्रभान आडकु भुते वय ५७ वर्ष २) सोमा बिसन निबार्ते वय ६० वर्ष ३) भारत नामदेव मेश्राम सर्व रा. सहायता नगर अडयाळ यांना लाठया काठयाने मारहान करून जखमी केले आहे अशा फिर्यादी पुरूषोत्तम दामा केवट वय ७० वर्ष रा सौंदड पुर्नवसन यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम१४३,१४७,१४८,१४९,४५२,३२४,३५४, ३२५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहेत.

**२) संगनमत करून बंडीच्या ऊभारीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०७/०७/०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी यांची शेती एकमेकाच्या शेताला लागुन असुन फिर्यादीचा जखमी मोठा भाऊ रविकांत मानिकराव पेटकर वय ५० वर्ष रा. उमरी हा शेतातील परे पाहण्यास गेला असता, यातील आरोपीतांनी संगनमत करून शिवधुऱ्या वरून भांडण करून आरोपी क्र. १ यांनी जखमीस पकडुन ठेवले व आरोपी क्र. २ यांनी बंडीच्या ऊभारीने डावे हाताचे कोणीजवळ व उजवे पायाचे गुडक्याजवळ मारून जखमी केल्याने फिर्यादी लक्ष्मीकांत माणीकराव पेटकर वय ४५ वर्ष रा. उमरी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२५,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल स्लिप होवुन मेन रोडवर पडुन युवकाचा मृत्युः –**

दिनांक ०२/०७/०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकलवर मित्र मृणाल सुभाष बडवाईक रा. साकोली याला बसवुन बस क्र. एमएच ४०/८१४० ला ओव्हरटेक करीत असतांना त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, लापरवाहीने व निष्काळीपणे चालवुन चिखलात मोटार सायकल स्लिप होवुन मेन रोडवर बसचे समोर पडल्याने मृतक मृणाल सुभाष बडवाईक याचे मरणास कारणीभुत झाल्याने, चौकशी अहवाल व पोस्टे भंडारा येथील मर्ग ००/१८ कनम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरून सरतर्फे फिर्यादी मपोउपनी फुकट यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. फुकट पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी–**

दिनांक ०७/०७/०१८ चे १२.०० ते १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी विजेंन्द्र तेजराम बेनीबागडे वय ३५ वर्ष रा. ढिवरवाडा पो.स्टे. करडी याने त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ डब्ल्यु ४२५९ कि. ४०,०००/रु. वंजारी यांचे घराशेजारील रोडचे बाजुला लॉक करून ठेवुन काम करीत असतांना कुणीतरी अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) नगदी पैसे व सिलेंडरची चोरी–

दिनांक ०४/०७/०१८ चे ०८.०० ते दि. ०७/०७/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे सपुंर्ण परिवारासह भिवापुर येथे मामाच्या अंतवीधी करीता दि. ०४/०७/२०१८ ला ०८.०० वाजता घरी परत आले तेव्हा घराचे समोरील दाराचा कुलुप तुटलेला असुन दरवाजा खुला असल्याने फिर्यादी याने आत जावुन पाहीले असता, बेडरूममधील संज्यावर ठेवलेली सुटकेस खाली खाटेवर काढुन सुटकेस मधील १०० रूपयाच्या १०० नोटा, २०० रूपयाचे ५० नोटा, ५०० रूपयाचे १० नोटा असे एकुण २५,०००/रु. व १ इंडीया कंपनीचा सिलेंडर असा एकुण २७,०००/रु. चा माल कुणीतरी अज्ञात चाराने चोरून नेल्याने फिर्यादी सधीरज रविंद्र करवाडे वय २७ वर्ष रा. गौतम बुंध्द वार्ड मेंढा रोड चर्च जवळ भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) मारोती व्हॅनच्या धडकेत तिन जखमी –

दिनांक १९/०६/०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील जखमी चालक मोटार सायकल क्र. एमएच ३६ व्ही ३२६१ पॅशन प्रो नी राहुल हेमराज गेडाम व मागे बसलेली पत्नी व मुलगा यातील आरोपी चालकाने मारोती व्हॅन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक दिल्याने मोटार सायकलवर बसलेल्यांना जखमी करण्यास व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयाण, एमएलसी रिपोर्ट व चौकशी अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी मपोउपनी. फटींग यांचे रिपोर्ट वरून यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८, भादवी. सहकलम १८४ मोकावा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

७) उपचरादरम्यान इसमाचा मृत्यु: –

दिनांक १२/०६/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील मृतक सुभाष मोहण पचारे वय ३५ वर्ष रा. सिंदपुरी याचा दि. १२/०६/२०१८ रोजी इतर सोबत्यासह मोटार सायकलने मागे बसुन प्रवास करीत असतांना अपघात घडल्याने जखमीला औषधोपचारा करीता होप हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता उपचरादरम्यान दि. १९/०६/२०१८ ला मरण पावल्याने पो.स्टे पाचपावली नागपुर शहर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाले सदर कागदपत्राचे अवलोकन करून अपघात कुठे झाला व कशामुळे झाला हे निश्चीत होत नसल्याने सदरचा मर्ग दाखल करण्यात आहे मर्ग चौकशी आहे किंवा कसे याबाबतच्या तपास करून पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याने फिर्यादी प्रकाश मोहण पचारे वय ४७ वर्ष रा. सिंदपुरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

८) ईलेक्ट्रीक करंट लागुन इसमाचा मृत्यु: –

दिनांक ०७/०७/२०१८ चे १६.३० ते १७.०० वाजता दरम्यान यातील मृतक योगेश नामदेव तोडरे वय ३० वर्ष रा. संराडी हा दादाजी राजीराम शेंडे यांचे शेतावर मजुरीचा कामावर जावुन शेतातुन ईलेक्ट्रीक डिपी जवळुन घरा कडे परत येत असतांना अचानक ईलेक्ट्रीक करंट लागुन मरण पावल्याने फिर्यादी लेखराम महादेव तोडरे वय ४५ वर्ष रा. संराडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०७/०७/२०१८ चे १६.४५ ते १७.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन ही जुना बस स्टॉप तुमसर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. धावडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावडे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

**अ)** दिनांक ०७/०७/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन ही मुरमाडी बस स्टॉप येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. तिजारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भलावी पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**ब)** दिनांक ०७/०७/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन ही मुरमाडी बस स्टॉप येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. तिजारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भलावी पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

११) अवैध देशी दारू अडड्यांवर धाडी . :–

दिनांक ०७/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, साकोली व अडयाळ येथे अवैध देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १२ लिटर हातभट्टी दारू + १८ किलो सडवा मोहा पास किमती ९१,२००/रु. व ०१ लिटर ८०० मिलीलीटर देशी दारू किमती ५२०/रु. तसेच असा एकुण किंमती ९१,७२०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०७/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनाकरीता– १६ ईतर वाहनांवरती – १२८ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.